
पेशवा

# पहिला बाजीराव

— प्रा.श.श्री. पुराणिक
एम.ए.



# पेशवा पहिला बाजीराव

## पूर्वार्ध

## ( १७२० - १७३० )

लेखक
प्रा. श. श्री. पुराणिक, (एम्. ए.)

काळ प्रकाशन, पुणे

प्रकाशक
मुकुंद शंकर दाते
काळ प्रकाशन,
१४०४, सदाशिव पेठ, पुणे - ३०.

© प्रा. श. श्री. पुराणिक

प्रथमावृत्ति
१८ ऑगस्ट १९९९

मुद्रक
मुकुंद शंकर दाते
यशवंत मुद्रणालय,
१८२६/२, सदाशिव पेठ, पुणे - ३०.

अक्षरजुळणी
पॅम आर्टस् ॲण्ड प्रिंट
सौ. पद्मिनी रुईकर
१३९५, कसबा पेठ, पुणे ४११०११.

मूल्य रु. २००/-

सौ. छायास

# अनुक्रमणिका

प्रस्तावना ९-२६

१. बाजीरावास पेशवे पदप्राप्ति २७-४६
१७००, ऑगस्ट १८ – बाजीरावाचा जन्म
१७२०, एप्रिल २ – बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु
१७२०, एप्रिल १७ – बाजीरावास पेशवाईची वस्त्रे

२. निजाम - साखरखेडला ४७-७६
१७१९, सप्टेंबर २८ – महंमदशहा बादशहा होतो.
१७२०, मे ८ – निजामाचे नर्मदा उत्तरण
१७२०, जून १९ – खांडव्याची लढाई
१७२०, ऑगस्ट १० – बाळापुरची लढाई
१७२०, ऑक्टोबर ८ – सय्यद हुसेनअलीचा खून
१७२०, नोव्हेंबर १४ – सय्यद अब्दुल्ला कैद
व खून दि. ११ ऑक्टोबर १७२२.
१७२२, फेब्रुवारी १३ – निजाम वजीर होतो.
१७२३, डिसेंबर ७ – निजामाचे दक्षिणेस प्रयाण.
१७२४, जून ११ – निजाम औरंगाबाद घेतो.
१७२४, सप्टेंबर ३० – फत्तेखेडर्याची लढाई, निजामाचा विजय.
१७२५, जून २० – निजामाची दक्षिणेवर नेमणूक.

३. कर्नाटक ७७-१००
१७२५, नोव्हेंबर - मे १७२६ – बाजीरावाची चित्रदुर्ग स्वारी.
१७२६, नोव्हेंबर - एप्रिल १७२७ – बाजीरावाची श्रीरंगपट्टण स्वारी.
१७२६, उन्हाळा – निजामाची कर्नाटकात स्वारी.
१७२७, मार्च ४ – बाजीरावाचा मुक्काम श्रीरंगपट्टणास.

४. निजाम-पालखेड १०१-१२८
१७२६, पावसाळा – संभाजीस निजामाने फोडले.
१७२६, सुलतानजी निंबाळकर व चिमणाजी दामोदर निजामास सामील.
१७२७, ऑगस्ट २७ – निजामावर बाजीरावाची चाल.
१७२७, ऑक्टोबर – निजामाची बाजीरावावर चाल
१७२७, नोव्हेंबर ५ – ऐवजखानाचा बाजीरावाकडून पराभव.
१७२७, डिसेंबर – निजामाचा पुणे प्रांतांत धुमाकूळ
१७२८, फेब्रुवारी – बाजीरावाचा खानदेशात धुमाकूळ.
१७२८, फेब्रुवारी २५ – पालखेडावर निजामास मराठ्यांचा घेरा.
१७२८, मार्च ६ – मुंगी-शेवगावचा तह

५. माळवा-आमझेरा १२९-१६६
१७२८, नोव्हेंबर २९ – आमझेराची लढाई – दोन सुभेदार गारद, चिमाजी अप्पाचा अपूर्व विजय.
१७२८, डिसेंबर १३ – चिमाजी अप्पा उज्जैनवर.
१७२९, फेब्रुवारी – बाजीरावाचा बुंदेलखंडात प्रवेश.
१७२९, मार्च १२ – महोबा येथे बाजीराव-छत्रसाल भेट.

६. बुंदेलखंड-छत्रसाल १६७-२१२
१६७०-१७३१ – छत्रसालाचा पराक्रम काळ
१७२९, एप्रिल २८ – बाजीरावाकडून बंगशाचा पराभव.
१७२९, डिसेंबर – मांडवगड पवार-होळकरांकडून काबीज.
१७३१, डिसेंबर १४ – छत्रसालाचा मृत्यु.

७. मस्तानी २१३-२४४

८. मध्यन्तर : वैयक्तिक २४५-३०७
१७३०, १० जानेवारी – शनिवारवाडा बांधण्यास सुरुवात.
१७३१, २ फेब्रुवारी – शनिवारवाड्याची वास्तुशान्त.
१७३४ – समशेर बहाद्दराचा जन्म.
१७३६, नवीन दिवाणखाना व मस्तानी महाल बांधला.

# साभार ऋणनिर्देश (संदर्भ - सूचि)


१. थोरले बाजीराव पेशवे - ना. वि. बापट
२. पहिले बाजीराव पेशवे - ना. के. बेहेरे
३. प्रतापी बाजीराव - म. श्री. दीक्षित
४. तेजस्वी तारका - म. श्री. दीक्षित
५. मराठी रियासत - मध्यविभाग १, २, ३ (जुनी आवृत्ति) - गो. स. सरदेसाई
६. मराठी रियासत - शककर्ता शिवाजी
७. मराठी रियासत - उग्रप्रकृति संभाजी
८. मराठी रियासत - स्थिरबुद्धि राजाराम
९. मराठी रियासत पुण्यश्लोक शाहू - बाळाजी विश्वनाथ
१०. मराठी रियासत पुण्यश्लोक शाहू - पेशवा पहिला बाजीराव
११. मराठी रियासत - बाळाजीराव नानासाहेब
१२. पेशवे दप्तर खंड - भाग ८ ते १८, २२, २८, ३०, ३१
१३. पुरंदरे दप्तर - भाग १ / ३ कृ. वा. पुरंदरे
१४. हिंगणे दप्तर - खंड १ - ग. ह. खरे
१५. चिमाजी अप्पा - कृ. वा. पुरंदरे
१६. ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र व पत्रव्यवहार - द. ब. पारसनीस
१७. ऐतिहासिक प्रस्तावना खंड १ - वि. का. राजवाडे
१८. मराठे व निजाम - सेतु माधवराव पगडी
१९. महाराष्ट्र व मराठे - सेतु माधवराव पगडी
२०. गुजरातेतील मराठी राजवट - वि. गो. खोबरेकर
२१. निजाम - पेशवे संबंध - त्र्यं. शं. शेजवलकर
२२. पोर्तुगीज - मराठे संबंध - पां. स. पिसुर्लेकर
२३. संचय - भ. श्री. पंडित
२४. ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे लेख - का. ना. साने
२५. मस्तानी - द. ग. गोडसे
२६. बाजीराव मस्तानी और उनके वंशज - बाँदा के नवाब - डॉ. भगवानदास गुप्ता
२७. Maharaja CChatrasala and His Times - Dr. Bhagwandas Gupta
२८. History of Aurangzeb Vol. I to V - J. N. Sarkar
२९. Fall of the Moghal Empire Vol. I, II - N. N. Sarkar
३०. राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास - ह. वा. देशपांडे

३१. शिखांचा इतिहास - न. वि. गाडगीळ
३२. महाराष्ट्र धर्म - भा. वा. भट
३३. इतिहासांतील सहली - य. न. केळकर खंड १, २
३४. सह्याद्रि - बाजीराव - अंक मे १९४०
३५. महाराष्ट्र इतिहास मंजिरी - द. वि. आपटे
३६. मल्हारराव होळकर यांचे चरित्र - अत्रे
३७. बायजाबाईसाहेब शिंदे चरित्र - द. ब. पारसनीस
३८. व्ही. एस. चे मार्मिक लेख - धुं. गो. जोशी
३९. निरंजन माधवाची कविता - सं. रा. चिं. ढेरे
४०. पानिपतची मोहिम - ना. वि. बापट
४१. पानिपतचा संग्राम - न. र. फाटक / सेतु माधवराव पगडी
४२. काबूल-कंदाहारच्या कथा - प्रतिभा रानडे
४३. होळकरांची कैफियत - सं. य. न. केळकर
४४. धर्मयुग (हिंदी) - १७/२४ जुलै १९८७ गायत्रीनंदन पंत यांचे महंमदशहा वरील लेख
४५. विविधा - रा. चिं. ढेरे
४६. समंदे तलाश - द. ग. गोडसे
४७. दुर्दैवी रंगू - चिं. वि. वैद्य
४८. श्रद्धांजलि - ग. त्र्यं. माडखोलकर
४९. दिवस असे होते - वि. द. घाटे
५०. प्राचीन मराठी कविपंचक - द. सी. पंगू
५१. श्रीशिवछत्रपति - त्र्यं. शं. शेजवलकर
५२. शेजवलकर लेखसंग्रह - प्रकाशक ह. वि. मोटे
५३. पानिपत - त्र्यं. शं. शेजवलकर
५४. पेशव्यांची बखर - सं. र. वि. हेरवाडकर
५५. बाळाजी आवजी चिटणीस - प. रा. दाते
५६. ऐतिहासिक पत्रबोध - गो. स. सरदेसाई
५७. ऐतिहासिक आख्यायिका - राजवाडे संशोधन मंदिर, धुळें
५८. इतिहासांतील नवलकथा
५९. शेवटचे बाजीराव पेशवे यांच्याविषयी काही आख्यायिका
६०. श्रीशिवछत्रपतीची बखर - सभासद सं. र. वि. हेरवाडकर

# प्रस्तावना

## 'बरे झाले देवा!'

'मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचा पूर्वार्ध 'छत्रपति संभाजी' जवळजवळ अठरा वर्षांपूर्वी ११ जून १९८१ रोजी कै. मामाराव दाते यांनी प्रसिद्ध केला. त्यानंतरचा उत्तरार्ध 'छत्रपति राजाराम आणि ताराबाई' या नावाने मामांनीच ६ डिसेंबर १९८२ रोजी प्रसिद्ध केला. त्याच्यापुढचा हा 'पेशवा पहिला बाजीराव' हा भाग आज प्रसिद्ध होत आहे. या दोन भागांमध्ये उण्यापुऱ्या अठरा वर्षांचा काळ गेला आहे. एवढा विलंब झाला नसता तर बरे झाले असते. पण त्याला काही इलाज नव्हता. अनेक गोष्टी आपल्या स्वाधीनच्या नसतात आणि असे इतिहासाचे किंवा ऐतिहासिक व्यक्तींबद्दलचे ग्रंथ मागणीप्रमाणे किंवा खपाप्रमाणे 'पाडता' येत नाहीत. त्यात एकवेळ नवे संशोधन नसले तरी आजपर्यंत झालेल्या संशोधनाची व अभ्यासाची चिकित्सा करावी लागते आणि त्याचा काही एक सुसंगत अन्वयार्थ लावावा लागतो. अशा ग्रंथांत तर्कशक्तीची व कल्पनाशक्तीची आवश्यकता असली, तरी केवळ त्यावरच मदार ठेवून चालत नाही. अनेक वेळेला तर्क तर्कदुष्ट असू शकतो, तो हेतु न होता हेत्वाभास होऊ शकतो आणि कितीही सावध राहिले तरी आपली कल्पना आपल्यालाच केव्हा 'वाममार्गा' ला नेऊन फसवू शकेल याचा काही नेम नसतो. यामुळे केवळ विधाने करून भागत नाही, प्रत्येक विधानाला शक्य तितका पुरावा संदर्भासह द्यावा लागतो. प्रत्येक परीक्षेत संदर्भासह स्पष्टीकरण देण्याचा एक प्रश्न असतो व तो अनिवार्य असल्यामुळे त्यातून सुटका नसते. इतिहासाचा ग्रंथ लिहिणे हीही अशीच संदर्भासह स्पष्टीकरण देण्याची परीक्षाच आहे. त्यामुळे या ग्रंथात ठिकठिकाणी कंसांची व संदर्भांची गर्दी झालेली वाचकांना आढळेल. ती त्यांना कितपत आवडेल हे सांगता येत नाही. परंतु भगवान् श्रीकृष्णाने पुराणांतरी 'कंसवध' करून धरणीचा भार हरण केला असला, तरी इतिहासांतला हा 'कंसवध' करणारा श्रीकृष्ण कधी अवतार घेईल की काय, याची शंका आहे. तात्पर्य इतकेच, की हे संदर्भ व पुरावे जमविण्याचे काम कष्टाचे, जिकिरीचे व वेळ खाणारे आहे; आणि या ग्रंथाला इतका विलंब लागण्याचे हे एक मोठे कारण आहे.

परंतु जे झाले ते बरे झाले. कारण हा विलंब लागल्यामुळेच मध्यप्रदेशातील डॉ. भगवानदास गुप्ता यांचे Maharaja Chhatrasal Bundela व 'मस्तानी, बाजीराव और उनके वंशज - बाँदार्क

नबाब' हे बाजीरावाबद्दलचे नवे संशोधन माझ्या वाचनांत आले. त्याहीपेक्षा विशेष म्हणजे द. ग. गोडसे यांचे मस्तानीवरचे वेळोवेळी प्रसिद्ध झालेले चिकित्सक लेख व 'मस्तानी' हे पुस्तक मी अभ्यासू शकलो. त्या दृष्टीने झाला हा विलंब उपकाक झाला असे म्हणावे लागते. जी गोष्ट आपणांस सकृद्दर्शनी प्रतिकूल वाटते, ती परिणामी अनुकूल ठरते. याच अभिप्रायाने तुकारामाने 'बरे झाले देवा निघाले दिवाळे। बरी या दुष्काळे कृपा केली॥ बरे झाले देवा बाईल कर्कशा। बरी हे दुर्दशा जनामध्ये॥' असे म्हटले आहे. तुकाराम तर आकाशाएवढा उंच माणूस. तो कुठे आणि आपण कुठे! पण आपणांसारख्या सामान्य माणासांनासुद्धा विचार केला म्हणजे 'बरे झाले देवा' असे म्हणण्याची वेळ येते. या ग्रंथाला लागलेल्या विलंबाबद्दल म्हणूनच माझीही भूमिका 'बरे झाले देवा' अशीच आहे.

## या चरित्राचे प्रयोजन काय?

मी लिहिलेल्या बाजीरावाच्या या चरित्राचे प्रयोजन सांगण्यापूर्वी, आधी बाजीरावाच्याच चरित्राचे आजच्या परिस्थितीत काही प्रयोजन आहे किंवा नाही, का तो म्हणजे केवळ इतिहासातले आणखी एक मढे उकरण्याचा रिकामा उद्योग आहे हे स्पष्ट केले पाहिजे. त्या दृष्टीने बाजीरावाबद्दल आज बरीच जागृति झाली आहे हे कबूल केले पाहिजे. शिरवाडकर यांचे 'दुसरा पेशवा' हे नाटक आणि इनामदार यांची 'राऊ' ही कादंबरी यांचा या संदर्भात मोलाचा वाटा आहे. या कादंबरीवर झालेली 'राऊ' ही दूरदर्शनवरची मालिका आपणांपैकी अनेकांनी पाहिली असेलच. उन्हाळ्यात जिवाला थंडावा आणणाऱ्या एका लोकप्रिय आईस्क्रीमचे नावच मुळी 'बाजीराव - मस्तानी' असे आहे, हे सांगितले म्हणजे बाजीरावाबद्दलची ( आणि मस्तानी बद्दलचीही ) ही जागृति अगदी 'तळागाळांतल्या' माणसांपर्यंत पोचलेली आहे, हे निराळे सांगावयास नको. अर्थात, बाजीरावाबद्दलची ही जागृति ऐतिहासिकदृष्ट्या कितपत निकोप, निर्दोष आणि समतोल आहे याबद्दल अनेकांच्या मनात शंका आहे. सेतु माधवराव पगडी एकदा म्हणाल्याचे आठवते, त्याप्रमाणे या जागृतीत, बाजीरावाच्या पराक्रमाला गौण स्थान देऊन, त्याच्या आयुष्याचा केवळ एक भाग असलेल्या मस्तानीला वाजवीपेक्षा अधिक प्राधान्य दिलेले आहे. आणि त्यामुळे गौण - प्रधान - भावाची उलटापालट होऊन, 'धन्याचे नाव गण्या आणि चाकराचे नाव रुद्राजी बोवा' असा प्रकार झालेला आहे. असे असले तरी, बाजीरावाबद्दल सामान्य लोकांतसुद्धा कुतूहल जागृत झाले आहे, ही मुद्द्याची बाब विसरता येत नाही. परंतु असे असले तरी, बाजीरावाच्या चरित्राचा आजच्या परिस्थितीत नेमका संदर्भ आणि नेमकी उपयुक्तता काय हा प्रश्न शिल्लक उरतोच. याचे उत्तर मीच देण्यापेक्षा भारताचे सरसेनापति कै. जनरल अरुणकुमार वैद्य यांनी, शनिवारवाड्यापुढे बाजीरावाच्या अश्वारूढ पुतळ्याचे ५ जानेवारी १९८४ रोजी अनावरण केले, त्या वेळी त्यांनी केलेल्या भाषणात आले तेच देतो म्हणजे झाले. ते म्हणाले –

'मराठा साम्राज्याच्या वाढीसाठी दिल्लीच्या पातशाहीशी झगडा देत असतानाच, परकीय नादीरशहाचे दिल्लीला आक्रमण होताच पातशाहीवर कठीण प्रसंग ओढवला, म्हणून तिकडे धाव घेणारे थोरले बाजीराव हे आगळ्या दूरदृष्टीचे वीरपुरुष होते. छत्रपति शिवाजी महाराजांच्या नंतर सर्व समर्थ असा एकमेव सेनापति म्हणजे बाजीराव होय. शत्रूला घेरा घालण्याचे, अति त्वरेने हालचाल करण्याचे त्याचे तंत्र परीपूर्ण होते. शिवाजी महाराजांचे गनिमी तंत्रही त्यांनी आत्मसात केले होते. इतिहासकार शेजवलकर यांनी बाजीरावाच्या संदर्भात केलेल्या लिखाणाचा उल्लेख करून जनरल वैद्य म्हणाले की, शेजवलकरांनी म्हटल्याप्रमाणे बुद्धि, युक्तीप्रमाणेच धाडस, चपळता, सततोद्योग, निगर्वी स्वभाव असलेल्या बाजीरावाकडे छक्के पंजे नव्हते, ब्राह्मणांचा कर्मठपणा नव्हता. नेपोलियनने मातीतून मार्शल निर्माण केले तसे बाजीरावाने बारगीर शिलेदारातून लढवय्ये सरदार निर्माण केले. त्यांचा घोडा अडविण्याचे सामर्थ्य कोणातही नव्हते. उण्यापुऱ्या चाळीस वर्षांच्या आयुष्यापैकी सतत वीस वर्षे हा माणूस सतत झुंजत राहिला आणि त्याने कधीही अपयश पदरी घेतले नाही. भारतीय जनतेस आणि आमच्या जवानांनाही मराठी पंतप्रधान आणि अजिंक्यवीर श्रीमंत थोरले बाजीराव यांची स्मृति सतत प्रेरणा देत राहील!' (महाराष्ट्र टाइम्स - दि. ६ जानेवारी ८४)

## बाजीरावाची चरित्रे: जुनी आणि नवी

खुद्द बाजीरावाच्या जीवनाचे सद्यःस्थितीतले औचित्य आणि संदर्भमूल्य सरसेनापति वैद्य यांनी सांगितले आहे, त्यापेक्षा अधिक समर्पक पद्धतीने सांगणे केवळ अशक्य आहे. कारण बाजीराव ज्या मार्गाने गेला तो मार्ग वैद्य यांनी आक्रमिलेला आणि आचरलेला आहे, आणि त्यामुळे त्यांच्या बोलण्याला 'हे तो प्रचीतीचे बोलणे। आधी केले मग सांगितले।' अशा अधिकारी पुरुषाच्या अधिकार वाणीचे वैभव प्राप्त झाले आहे. असे असले तरी, प्रस्तुत चरित्राचा विचार करताना, कोणीही साहजिकच पहिला प्रश्न विचारील, की मराठीत बाजीरावाची एवढी चरित्रे असताना, आणखी ह्या एका चरित्राचे प्रयोजन काय? या प्रश्नावरून बाजीरावाची मराठीत शे-दीडशे चरित्रे आहेत व म्हणून सदर चरित्र गतार्थ झालेले आहे, असा प्रश्नकर्त्याचा रोख असल्याचा भास होतो. अशी जर खरोखरच स्थिति असती तर, माझी मोठी अडचण झाली असती, पण खरे म्हणजे मला फार आनंद झाला असता, पण दुर्दैवाने तशी वस्तुस्थिति नाही. 'बहुरत्ना वसुंधरा' अशा या मराठी भूमीने ज्या प्रमाणात मोठी माणसे निर्माण केलेली आहेत, त्या प्रमाणात त्यांची चरित्रे निर्माण केलेली नाहीत. बाजीरावावर माझ्या माहितीप्रमाणे आजपर्यंत मराठीत फक्त चार चरित्रे लिहिली गेली आहेत. (चूकभूल द्यावी घ्यावी). पहिले चरित्र नागेश विनायक बापट यांचे 'बाजीराव चरित्र' १८७९ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर सरदेसायांच्या मराठी रियासतींचा पाचवा भाग 'पुण्यश्लोक शाहू: पेशवा बाजीराव' या नावाने १९४२ च्या

एप्रिल मध्ये प्रसिद्ध झाला. त्याच्या आधी १९२८ च्या सुमारास ना. के. बेहेरे यांचे 'पहिले बाजीराव पेशवे' यांचे चरित्र प्रसिद्ध झाले. त्यानंतर १९७९ च्या मे महिन्यात म. श्री. दीक्षित यांचा 'प्रतापी बाजीराव' प्रसिद्ध झाला. बाजीरावाबद्दलचे उपलब्ध चरित्र ग्रंथ म्हणता येतील असे एवढेच ग्रंथ आहेत.

१९३६ साली चरित्ररूपाने मराठी रियासतींचे पुनर्लेखन करण्यास सरदेसायांनी आरंभ केला. त्या मालिकेतीलच बाजीरावावरील त्यांचा ग्रंथ आहे. सरदेसाई हे मूलतः इतिहासकार असल्यामुळे त्यांच्या चरित्रग्रंथालाही इतिहासाचे स्वरूप यावे हे स्वाभाविकच होते आणि 'मराठी रियासती' चा एक भाग म्हणूनच त्यांनी बाजीरावाचे चरित्र लिहिले असल्यामुळे, ग्रंथ वाचल्यानंतर, चरित्रापेक्षा तो इतिहास असल्याचाच ठसा मनावर अधिक उमटतो. बापटांचे चरित्र म्हणजे सर वॉल्टर स्कॉटच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या धर्तीवर लिहिलेली ऐतिहासिक कादंबरी वाटते. त्यात रंजकता आणि रसाळपणा पुष्कळच आहे पण इतिहास थोडा आहे. त्याला बापटांचाही काही इलाज नव्हता. कारण, त्यांच्या वेळी अस्सल ऐतिहासिक साधने मुळांतच उपलब्ध नव्हती. त्यांनी चरित्र लिहिले त्याच वर्षी मुळी 'काव्येतिहास संग्रह' या मराठीतील पहिल्या अस्सल ऐतिहासिक साधनग्रंथाचा प्रारंभ झाला, आणि राजवाड्यांच्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या साधनग्रंथांच्या मालिकेतला पहिला खंड त्यानंतर एकोणीस वर्षांनी प्रसिद्ध झाला. बेहेरे यांच्या चरीत्रात नवी माहिती प्रायः नाहीच. जी आहे ती सरदेसायांच्या 'रियासती' तून घेतलेली आहे. पण बाजीरावाबद्दलची उपलब्ध माहिती एकत्र करून जोरदार शैलीत मांडली आहे, हा बेहेरे यांच्या चरित्राचा गुण आहे. बेहेरे यांची भूमिका निर्लेप, तटस्थपणाची नसून, आग्रही प्रचारकाची असल्याचा वारंवार भास होतो व विभूतीपूजा तर त्यांच्या ठिकाणी आहेच आहे. त्यांच्या चरित्राचा समारोप ज्या पद्धतीने त्यांनी केला आहे, त्यावरून हे स्पष्ट होईल. 'शतकोटी अभंग लिहिण्याची नामदेवाची अर्धवट राहिलेली प्रतिज्ञा तुकाराम महाराजांनी पूर्ण केली, त्याप्रमाणेच श्रीशिवप्रभूंच्या पुण्यपदावर पावले टाकून बाजीरावाने स्वराज्यमंदिरावर हिंदुपद पातशाहीचा मजला चढविला व हिंदवी स्वराज्य ही त्या पुण्यश्लोक नृपाची प्रतिज्ञा अक्षरशः सार्थ केली.' (पृ. ३१५)

या सर्व चरित्रांत १९७९ साली प्रसिद्ध झालेले म. श्री. दीक्षित यांचे 'प्रतापी बाजीराव' हे चरित्र उजवे ठरेल असे वाटते. १९४२ साली सरदेसायांचा 'बाजीराव' प्रसिद्ध झाल्यानंतर सदतीस वर्षांत बाजीरावाचे झालेले हे पहिलेच चरित्र आहे. पण दीक्षितांच्या चरित्राचे महत्त्व एवढेच नाही. १९७९ पर्यंत बाजीरावावर झालेले सारे संशोधन जमेला धरून हे चरित्र लिहिलेले आहे हे याचे वैशिष्ट्य आहे. सरदेसायांचे पेशवे दप्तर, राजवाडे यांचे खंड, पिसुर्लेकर यांचे 'पोर्तुगीज - मराठे संबंध', पगडी यांचे 'मराठे व निजाम' याप्रमाणे डॉ. भगवानदास गुप्ता यांचे 'महाराज छत्रसाल बुंदेला' ह्याही संशोधनाचा यात परामर्श घेतलेला आहे. त्याखेरीज इंग्रजी ग्रंथ वेगळेच. ग्रंथात मस्तानीवर 'मस्तानी - शोध व बोध' या नावाचे स्वतंत्र परिशिष्ट आहे. त्याचप्रमाणे, कालपट, संदर्भ निर्देश, सूचि, कौटुंबिक जीवन, बाजीरावाची मुद्रा, हस्ताक्षर, रावेरखेडीला

जाण्याचा मार्ग इत्यादि बारीकसारीक तपशील देऊन दीक्षितांनी आपले चरित्र अद्ययावत् करण्यात कोणतीही कसूर केलेली नाही. पण या ग्रंथाचा सर्वात मोठा गुण म्हणजे संक्षेप चातुर्य आणि गतिमानता होय. बाजीरावाचे घटनांनी गजबजलेले छोटे जीवन म्हणजे 'An infinite riches in a narrow room' लहान खोलीतला मोठा खजिना अशा प्रकारचे आहे, ते थोडक्यात सांगणे म्हणजे तारेवरची कसरत करण्यासारखे आहे. पण हे अवघड काम, कोठलाही आवश्यक संदर्भ न टाळता व कसलाही फापट पसारा न मांडता दीक्षितांनी चातुर्याने सिद्धीस नेले आहे. त्या दृष्टीने त्यांचे हे चरित्र म्हणजे 'A marvel of compression'- संक्षेप चातुर्याचा चमत्कार म्हणावा लागेल. त्याचप्रमाणे अखंड घोडदौड करणाऱ्या बाजीरावाच्या जीवनातील गतिमानता दीक्षितांनी आपल्या धावत्या शैलीमुळे प्रत्यक्षात आणली आहे. युरोपचा बाजीराव असलेल्या त्यांच्या नेपोलियन चरित्रातही चरित्रनायकाच्या जीवनातील गतिमानता चरित्रात उतरविण्यात असेच स्पृहणीय यश त्यांनी संपादन केले आहे. मला स्वत:ला त्यांच्या बाजीराव चरित्राचा फारच उपयोग झाला आहे आणि आजही बाजीरावाचे थोडक्यात पण संपूर्ण दर्शन घडवण्याच्या दृष्टीने दीक्षितांच्या बाजीरावाकडे बोट दाखविण्यास पर्याय नाही.

## हे चरित्र आहे: इतिहास नव्हे

दीक्षितांच्या बाजीराव चरित्रानंतर जवळजवळ वीस वर्षांनी माझे हे बाजीराव चरित्र प्रसिद्ध होत आहे. म्हणजे प्रथम सांगितले त्याप्रमाणे १८७९ पासून एकशेवीस वर्षांत बाजीरावाची फक्त पाच चरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत. बाजीरावासारख्या इतिहास घडविण्याऱ्या पुरुषाच्या बाबतीत इनमीन पाच चरित्रे म्हणजे काही फार हेवा करण्यासारखे 'वैपुल्य' नव्हे. मी लिहिलेल्या या चरित्राचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे हे चरित्र आहे, हा इतिहास नव्हे. चरित्र म्हणजे इतिहास नव्हे आणि इतिहास म्हणजे चरित्र नव्हे; जरी कार्लाइलने 'History is the biography of great men' असे म्हटले असले तरी ते अर्धसत्य आहे. इतिहासाचा विषयच मुळी एका संबंध राष्ट्राचे जीवन असते आणि कितीही मोठी व्यक्ति असली तरी इतिहासाचे ती केंद्र होऊ शकत नाही. उलट चरित्रात व्यक्ती प्रधान व त्याच्या काळाचा इतिहास गौण आणि पार्श्वभूमीसारखा असतो. चरित्रात व्यक्तीच्या जीवनातील लहान - मोठ्या घडामोडी तर अर्थात योग्य त्याप्रमाणाचे अवधान ठेवून द्याव्या लागतातच पण त्यापेक्षांही चरित्रनायकाचे व्यक्तिदर्शन त्याच्या सर्व बऱ्यावाईट पैलूंसह घडविणे हे चरित्रकलेचे सारसर्वस्व समजावे लागते. अशा प्रकारचे व्यक्तिदर्शन घडविताना लेखकाची वृत्ति शक्य असेल तितकी सहानुभूतीपूर्ण पण त्याच वेळी तटस्थ आणि समतोल तर असावीच लागते; पण मुख्य म्हणजे, विभूतिपूजेपासून ती सर्वस्वी मुक्त असली पाहिजे. चरित्र हे कोणत्याही व्यक्तीच्या खंडनासाठी किंवा मंडनासाठी लिहिले जात नाही; तर ती व्यक्ती जशी असेल तसे तिचे दर्शन घडविण्याच्या एकमेव उद्देशाने लिहिले जाते. या बाबतीत इतिहास

व चरित्र यांच्यात विलक्षण साधर्म्य आहे व म्हणून इतिहासाबद्दल राजवाडे यांनी काढलेले उद्‌गार ऐतिहासिक व्यक्तींच्या चरित्रालाही तंतोतंत लागू पडतात.

'कोणत्याही ऐतिहासिक पुरुषाच्या गुणदोषांचे जे चित्र काढावयाचे असते ते दस्तऐवजी पुराव्यावरून काढावयाचे असते. आपले पूर्वज मोठे होते, शूर होते, कर्तृत्ववान् होते, नीतिमान् होते अशी अभिमानाची प्रौढी मिरवण्यात मौज आहे खरी. पण ते सर्वगुणसंपन्न होते, त्यांच्यात दोष बिलकूल नव्हते, ते नीतीचे केवळ पुतळे होते, वगैरे देवांना साजणाऱ्या गुणांचा आरोप त्यांजवर करणे म्हणजे मनुष्यस्वभावाची अट्टाहासाने थट्टा करण्यासारखेच आहे. वर्तमान व भावी पिढ्यांना आपल्या पूर्वजांचे गुणदोष कळावे, कोणत्या गुणांच्या जोरावर त्यांनी राष्ट्राची उन्नति केली व कोणत्या दोषांच्यामुळे ते राष्ट्राच्या अवनतीला कारण झाले, हे ज्ञान त्यांस व्हावे हा तर इतिहास लिहिण्याचा प्रधान हेतू आहे. तो एकीकडे सारून काल्पनिक वर्णने लिहिण्यात तात्पर्य काय? ब्रह्मेंद्रस्वामी नीतिमान् होता, गोविंदपंत बुंदेले स्वामिनिष्ठ होता, महादजी शिंदे महाराष्ट्र साम्राज्याभिमानी होता, वगैरे वर्णने वाचली म्हणजे वाचकांच्या मनात कारणांचा विपर्यास उत्पन्न होतो व तो भलत्याच विचारसरणीचा अवलंब करतो. तो म्हणतो, एवढे नीतिमान्, स्वामिनिष्ठ व अभिमानी पुरुष असताना ज्या अर्थी पानिपतासारखे संकट आले व १८१८ तल्यासारखी क्रान्ति झाली, त्या अर्थी आपल्या या देशाची भवितव्यताच बलीयसी, दुसरे काही नाही! ही दैववादाची विचारसरणी मोठी घातुक आहे. ह्या विचारसरणीचा मनावरती एकदा पगडा बसला म्हणजे प्रयत्नांची दिशा जी राष्ट्राच्या उन्नतीचा केवळ प्राण आहे तिची वाढच खुंटते. आपल्या इकडे असल्या चरित्रांना अजिबात फाटा देणे अत्यंत जरूर आहे. शनिमाहात्म्य, बुधबावन्नी, गुरुचरित्र, शिवलीलामृत वगैरे काल्पनिक व दैववादी पुस्तकांचा भरणा आपल्या इकडे कमी आहे असे नाही. त्यांतच ऐतिहासिक काल्पनिक चरित्रांची भर घालण्यात फायदा कोणता?'
(ऐतिहासिक प्रस्तावना - खंड ३, पृ. १९१-१९३)

प्रस्तुत चरित्रात सर्वत्र ही विभूतिपूजेपासून अलिप्त असलेली ऐतिहासिक आणि वस्तुनिष्ठ वृत्ति वापरलेली दिसेल. बाजीराव हा मोठा माणूस असला तरी अखेर तो माणूसच होता व माणसांना स्वाभाविक असलेल्या उणीवांपासून तोही मुक्त नव्हता, या दृष्टीने त्याच्या जीवनातील यशापयशाच्या घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा ह्या ग्रंथात प्रयत्न केलेला आहे. बाजीरावाचा मोठेपणा आणि त्याच्या प्रतिपक्ष्यांचा कमीपणा सिद्ध करण्याच्या अट्टाहासाने हे चरित्र लिहिलेले नाही. बाजीरावाला पेशवेपद मिळण्याच्या बाबतीत प्रतिनिधि प्रभृतींचा जो विरोध होता, त्याला बाजीरावाच्या स्वभावातल्या त्रुटीही काही प्रमाणात जबाबदार होत्या. बाजीरावाने निजामाला मिळालेल्या त्र्यंबकराव दाभाडे याचे पारिपत्य केले हे योग्य असले तरी, त्यामुळे त्र्यंबकरावाच्या गुजराथच्या कार्यक्षेत्रात बाजीरावाने केलेला हस्तक्षेप समर्थनीय ठरत नाही. 'समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी' या मराठ्यांच्या राष्ट्रीय दुर्गुणापुळे जंजिऱ्याच्या स्वारीत जवळ जवळ अपयश म्हणावे लागेल इतके उपेक्षणीय यश मराठ्यांना आले, त्या दुर्गुणास बाजीरावही अपवाद नाही;

दिल्लीच्या मोगलाई पातशाहीच्या मूळावर घाव घालून तेथे हिंदुपद पातशाही स्थापण्याचा बाजीरावाने प्रयत्न केला हे प्रसिद्ध व लोकप्रिय विधान ऐतिहासिक कसोटीवर टिकणारे नाही; बाजीरावाच्या मनात कदाचित् अशी कल्पना असलीच तरी त्या वेळच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीमुळे त्याला ती सिद्धीस नेता आली नाही; याच सामाजिक व राजकीय परिस्थितीमुळे मस्तानीची समस्या बाजीरावाच्या आयुष्यात निर्माण झाली; तिच्यामुळे त्याच्या जीवनाची शोकांतिका झाली पण त्या परिस्थितीत ती अटळ होती; व तिच्याबद्दल बाजीराव किंवा मस्तानी तर राहोच, पण राधाबाई आणि चिमाजी अप्पा यांनाही जबाबदार धरता येत नाही; असे कित्येक निष्कर्ष या सत्यसंशोधनाच्या दृष्टीने या ग्रंथात मांडले आहेत. ते अर्थातच सर्वांना मान्य होतील असे नाही. कारण मतभेद असणे हेच जिवंतपणाचे लक्षण आहे. असे असले तरी या निष्कर्षामागची ऐतिहासिक आणि वस्तुनिष्ठ दृष्टि मात्र सर्वांना मान्य व्हावी अशी अपेक्षा आहे. ह्या ग्रंथाचे हे स्वरूप ध्यानात घेऊन तो वाचला जावा; केवळ 'बाजीरावविजय' किंवा 'बाजीरावप्रशस्ति' किंवा 'बाजीरावलीलामृत' म्हणून पोथीप्रमाणे वाचला जाऊ नये अशी मी अपेक्षा बाळगतो.

## चरित्र, पण चरित्रात्मक कादंबरी नव्हे

या चरित्राच्या शैलीबद्दल दोन शब्द सांगणे अवश्य आहे. मेकॉलेने इतिहासाची व्याख्या करताना म्हटले आहे की, History is a true novel. इतिहास ही खरीखुरी कादंबरीच आहे. चरित्राच्या बाबतीतही मला तीच व्याख्या अभिप्रेत आहे. सहानुभूतीजन्य कल्पनाशक्ति म्हणजे एखाद्या व्यक्तीशी व तिच्या काळाशी समरस होणारी कल्पनाशक्ति जर असेल, तर तिच्यामुळे एरवी रुक्ष आणि गद्यप्राय असणारे मानवी जीवितही 'Truth is stranger than fiction' या न्यायाने कादंबरीपेक्षाही रमणीय आणि चित्तवेधक असल्याचा अनुभव येणे शक्य आहे. एवढेच की ज्यांची कथा आपण सांगत आहोत, ती माणसे आज हयात नसली तरी एकेकाळी ती आपणांसारखीच जिवंत होती आणि सुखदु:खांचे अनुभव घेत होती या गोष्टीचे अवधान अखंड बाळगले पाहिजे. या दृष्टीने इतिहासातली कोणतीही व्यक्ति कधी मरतच नाही. त्या नेहमी जिवंतच असतात. इतिहासातल्या या तथाकथित मृत व्यक्तींच्या अणुरेणूत खेळत असलेल्या जिवंत चैतन्याचा साक्षात्कार माटे यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या प्रतिभावंताला झाला नसता तरच नवल! ज्यांची संभावना प्राकृत जनांकडून 'तेलातुपाची पत्रे' अशा तुच्छ शब्दात केली जाते, ती ऐतिहासिक पत्रे माटे यांना कादंबरीप्रमाणे रम्य वाटत. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे – 'माझ्या टेबलावर जर दोन पुस्तके येऊन पडली - एक सर्वांनी नावाजलेली श्रेष्ठ लेखकाची कादंबरी व दुसरे इतिहासमंडळाने प्रसिद्ध केलेले मराठेशाहीतील पत्रांचे दप्तर, तर त्या दोघांपैकी पत्र व्यवहाराचे पुस्तक मी प्रथम हातात घेईन आणि कादंबरी केव्हाच घेणार नाही. ऐतिहासिक पत्रव्यवहार वाचण्याची माझी आवड केवळ अनिवार आहे. अशी पुस्तके वाचू लागलो की,

आपण जिवंत माणसांच्या संगतीत आणि खरोखरे जे काय सांगावयाचे होते ते सांगणाऱ्या माणसांच्या संगतीत वागत आहोत असे मला वाटू लागते. प्रसंग, संबंध, व्यक्ति आणि स्थळविशेष यांचे वैविध्य तर इतके मुबलक असते की वाचनात तेच ते पण उत्पन्न होत नाही व मनाला सुंदर आंदोलने मिळतात. आणखी एका कारणाने हे किंवा यासारखे वाङ्मय मला अत्यंत रमणीय वाटते. जुन्या भाषेचा डौल यात पाहावयास सापडतो. या वाङ्मयातील म्हणजे जुना पत्रव्यवहार व बखरवाङ्मय यातील मराठी भाषा ठसठशीत, जोरकस, सरळ ठोक, खास देशी व लक्ष्याचा अचूक वेध करणारी असते. ऐन कर्तृत्वाच्या काळात ती लिहिलेली असल्याने ती जिवंत असल्यासारखी वाटते.' ('माझी वाचनाची तऱ्हा'- हंस, जून १९४६)

अर्थातच चरित्र कादंबरीसारखे असावयाचे म्हणजे भूतकाळांतल्या व्यक्तिरेखांची पुनर्निर्मिति व कलापूर्ण निवेदन याच गोष्टी अभिप्रेत असल्या पाहिजेत. त्यांत तर्काला व कल्पनेला वाव असला तरी, काल्पनिकतेला म्हणजे काल्पनिक पात्रे, काल्पनिक संवाद व काल्पनिक प्रसंग यांना बिलकूल वाव नाही. ज्याला पुरावा नाही असल्या कोणत्याही गोष्टीला पासपोर्ट नसलेल्या परदेशाच्या प्रवाशाप्रमाणे अशा चरित्रात प्रवेश नाही. चरित्रात्मक कादंबरी आणि मी म्हणतो तशा प्रकारचे चरित्र यातला मूलभूत फरक हा असा आहे. इंग्रजीत Irving Stone च्या 'Lust for Life', 'Agony and Ecstacy' व मराठीत 'झुंज', 'झेप', 'राऊ', 'मंत्रावेगळा', 'स्वामी' अशा चरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्या आपापल्या परीने उत्तमच आहेत. परंतु त्या कादंबऱ्याच आहेत हे त्यांचे कर्तेही नाकारणार नाहीत असे वाटते. 'कादंबऱ्या' म्हणताना कोणतीही तुच्छता मला अभिप्रेत नाही. तो प्रकार वेगळा आहे एवढेच मला म्हणावयाचे आहे. प्रस्तुत चरित्र लिहिताना माझ्या डोळ्यांपुढे उदाहरणे असलीच तर ती पाश्चात्य वाङ्मयातील, एमिल लुडविगचे 'नेपोलियन' आन्द्रे मॉर्वाचे 'बायरन' 'व्हिक्टर ह्यूगो', व विशेषत: स्टीफन झ्वाइगचे 'मेरी अँन्टोनिएट' 'क्वीन ऑफ स्कॉटस्' या नितांत सुंदर व ललितरम्य, पण चरित्रांचीच होय.

वि. स. वाळिंबे यांची 'सावरकर' व 'नेताजी' ही अशीच सुरेख चरित्रे आहेत. अर्थात् अशी चरित्रे लिहिताना 'अब्रह्मण्यम्' म्हणून ऐतिहासिक कादंबऱ्यांवर बहिष्कार पुकारावा असेच काही नाही. बाजीरावाच्या बाबतीत विचार करताना वि. वा. हडप यांच्या 'पेशवाईवरील गण्डान्तर' व 'पेशवाईचा पश्चिम दिग्विजय' या कादंबऱ्यांनी केवढेतरी कार्य केलेले आहे! हडपांच्या कादंबऱ्यात दोष काढणे सोपे आहे पण त्यांचा व्यासंग व सगळ्या पेशवाईचा इतिहास पंचवीस कादंबऱ्यांतून सांगण्याचा त्यांनी केलेला अवाढव्य उद्योग नाकारणे शक्य नाही. तीच गोष्ट इनामदार यांच्या 'राऊ' या कादंबरीची. बाजीराव आणि मस्तानी यांचे जे जगावेगळे वादळी भावजीवन त्यांनी ज्या समरसतेने रंगवले आहे, त्याला खरोखर तोड नाही. ती कादंबरी कितीतरी सुंदर आहे! बाजीरावाच्या चरित्रातला एवढाच कालखंड इनामदारांनी निवडला असल्यामुळे बाजीरावाच्या चरित्राचा विपर्यास केल्याचा त्यांच्यावर दोष येत नाही. पण तशी गोष्ट रणजित देसाई यांच्या 'स्वामी' ची

नाही. अर्थात त्यातही दोष लेखकापेक्षा वाचकांचाच आहे. 'स्वामी' ची चौदावी आवृत्ति निघाली पण 'स्वामी' कार संतुष्ट झाले नाहीत. ते म्हणाले– 'यांत नवीन काय आहे? माझ्या इच्छेविरुद्ध प्रकाशकांनी मागील बाजूस माझा फोटो टाकला आहे एवढेच. दर नऊ महिन्यांनी नवी आवृत्ति निघते आहे. वरचे नऊ दिवस देखील पूर्ण होत नाहीत, पण लोक लट्टू आहेत. मला विचाराल तर I hate SWAMI! (स्वामीचा मला तिरस्कार वाटतो) ज्या उद्देशाने मी 'स्वामी' लिहिली तो उद्देश बाजूलाच राहिला. रमामाधवाची प्रेमकथा म्हणून लोक ती वाचतात. तिच्यात रंगून जातात. त्यापेक्षा 'राधेय' ची आवृत्ति निघाली असती तर मला आनंद झाला असता. तिला खूपशी खोली आहे. स्वामीला किती आहे? काय परिणाम झाला समाजावर स्वामीचा?' (विवेक - मुलाखत २ फेब्रुवारी १९९२)

ह्या संदर्भात गो. नी. दांडेकरांनी एकदा काढलेले उद्गार मला आठवतात. हरिभाऊंची 'वज्राघात' कादंबरी वाचून मी त्यांना म्हटले, 'वज्राघातमधले रामराजाचे स्वभावचित्रण किती सुरेख आहे!' त्यावर ते चटकन म्हणाले– 'पण ते काल्पनिक आहे ना!' पण अजूनही माझे 'लाडके' मत असेच आहे की, इतिहासाची साधने तादृश उपलब्ध नसतानाही, इतिहासातील सत्याशी इमान राखून कादंबरीतले सत्य रंगविणारा आणि 'उषःकाल', 'गड आला पण सिंह गेला', 'सूर्यग्रहण' मधला शिवाजी, 'केवळ स्वराज्यासाठी' मधला संभाजी, राजाराम व औरंगजेब, 'चंद्रगुप्त' मधला चाणक्य आणि मुरादेवी, 'रुपनगरची राजकन्या' मधला औरंगजेब व दुर्गादास यांच्यासारख्या अकलंक ऐतिहासिक व्यक्तिरेखा निर्माण करणारा ऐतिहासिक कादंबरीकार हरिभाऊंशिवाय दुसरा अद्याप झाला नाही व पुढे होईल की नाही हे काळालाच माहीत.

तात्पर्य इतकेच की, ही कादंबरी आहे, इतिहास नव्हे, एवढे अवधान बाळगले तर कादंबऱ्यांचाही चरित्राच्या दृष्टीने पुष्कळच उपयोग होण्यासारखा आहे. मी तसा केलेला आहे व त्याबद्दल या सर्व कादंबरीकारांचा मी ऋणी आहे.

## द. ग. गोडसे व य. न. केळकर

बाजीरावाचे नाव घेतले की (निदान अलिकडे तरी) मस्तानीची आठवण होते आणि मस्तानीची आठवण झाली की कै. द. ग. गोडसे यांची आठवण झाली पाहिजे, एवढ्या वरच्या दर्जाचे संशोधन गोडसे यांनी मस्तानीबद्दल केले आहे. जणु त्यांचा आणि मस्तानीचा काही ऐतिहासिक ऋणानुबंधच असावा! १९७८ पासून १९९० पर्यंत वेळोवेळी मस्तानीबद्दल त्यांनी जे लेख लिहिले ते आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आहेत. गोडसे यांच्या संशोधनात किती बारकावा आहे हे त्यांचे 'पोत', 'समंदे तलाश' 'शक्तिसौष्ठव' ही पुस्तके वाचणारांस सांगणे नकोच. मस्तानीची कुळकथा, तिचा काळ, तिचे चित्र (जे नाहीच), तिच्या संदर्भातले बखरीपासून ऐतिहासिक पत्रांतील उल्लेख, तिच्या बुंदेलखंडातील छत्रसालाच्या घरातील संस्कार इत्यादि अनेक

बाबींचा परामर्श केवळ मराठीच नव्हे तर फारशी, हिंदी व संस्कृत साधनांचे सूक्ष्म पृथक्करण करून त्यांनी घेतलेला आहे. व 'रायाची कलावंतीण' म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या ह्या मस्तानीला पुन्हा प्रतिष्ठेच्या स्थानावर प्रस्थापित करून तिला मरणोत्तर न्याय दिलेला आहे. परंपरेने व पूर्वग्रहांनी मलिन झालेली मेरी ॲन्टॉनिएटची प्रतिमा ज्याप्रमाणे स्टीफन झ्वाइगने आपल्या प्रतिभेने व जिवन्त सहानुभूतीने 'Marie Antoinette' या ग्रंथात पुन्हा निष्कलंक आणि उजळ केली, त्याची आठवण गोडसे यांनी ज्या रीतीने मस्तानीची प्रतिमा उजळ केली, ती पाहिली म्हणजे होते.

त्यांच्या ग्रंथाच्या वाचनामुळेच भगवानदास गुप्ता यांच्या 'छत्रसाल' व 'मस्तानी, बाजीराव और उनके वंशज बाँदाके नबाब' या ग्रंथांकडे माझे लक्ष गेले व प्रणामी पंथाची मला माहिती झाली, इतकेच नव्हे तर तंत्र मार्गाची थोडी तरी माहिती असल्या शिवाय संभाजीच्या जीवनाचे कोडे उलगडणे ज्याप्रमाणे अशक्य आहे, त्याप्रमाणे प्रणामी पंथाची माहिती असल्याशिवाय मस्तानी समजणे अशक्य आहे याची खात्री पटली. गोडसे यांचे सर्वच निष्कर्ष मी अर्थातच स्वीकारलेले नाहीत. उदाहरणार्थ, मस्तानीचा छळ झाला त्यासंदर्भात राधाबाई व चिमाजी अप्पा यांना गोडसे यांचे प्रमाणे कृत्या व खलनायक ठरवण्याची मला आवश्यकता वाटलेली नाही व मस्तानी व बाजीरावाचे कुटुंबीय यांच्यातला संघर्ष मूलत: राजकीय वारसाहक्काचा होता असे माझे निदान आहे. पण मतभेद असले म्हणून गोडसे यांच्या संशोधनाचे मूल्य थोडेसुद्धा उणे होत नाही. उलट गोडसे यांची 'मस्तानी' हा बाजीरावाबद्दलच्या ऐतिहासिक संशोधनातला महत्त्वाचा टप्पा आहे. आणि त्यांचे ग्रंथ वाचल्याशिवाय बाजीरावाच्या अभ्यासकाला पर्याय नाही असेच माझे मत आहे.

गोडसे यांच्या प्रमाणेच य. न. केळकर यांचाही उल्लेख अवश्य केला पाहिजे. 'इतिहासातील सहली' या त्यांच्या ग्रंथातला 'छत्रपति व पेशवे यांचे अनौरस वंशज' या लेखाचा या संदर्भात मला फारच उपयोग झाला. विशेषत: मस्तानीच्या महालाचे अस्सल वर्णन त्यांच्याच पुस्तकात मला वाचावयास मिळाले. संशोधक किती कष्टाने आणि कणाकणाने माहिती गोळा करीत असतो हे केळकरांचे 'भूतावर भ्रमण', 'वसईची मोहीम', 'ऐतिहासिक पोवाडे' इत्यादि ग्रंथ पाहिले म्हणजे सहज समजते. मूलगामी संशोधनाबरोबरच त्यांच्या ठायी रसाळ भाषाशैलीचा संगम झाला असल्यामुळे त्यांचे लेख हे रुक्ष व कंटाळवाणे न होता, ती खरोखरच इतिहासातली एक सहलच होते. अशा संशोधकांच्या कष्टांवरच, अशी चरित्रे उभी राहात असतात हे विसरता येण्यासारखे नाही.

## बाजीरावाच्या समाधीचे दर्शन : एक अविस्मरणीय अनुभव

गोडसे यांचे मस्तानीवरचे पुस्तक वाचल्यानंतर मस्तानीच्या कबरीचे - गोडसे यांच्या भाषेत 'समाधीचे' – दर्शन घेणे ओघानेच आले. ते मी घेतले कारण ते सोपे होते. कारण मस्तानीची समाधि पुणे जिल्ह्यात पाबळ येथे गावाबाहेर आहे. परंतु बाजीरावाच्या समाधीचे दर्शन घेणे

सोपे नाही. एकवेळ रायगडला जाणे सोपे आहे, पानिपतला जाणे सोपे आहे, विजयनगरला जाणे सोपे आहे परंतु बाजीरावाची समाधि असलेल्या रावेरखेडीला जाणे फार कठीण आहे. कारण ते हमरस्त्यावरचे गाव नाही, ते रेल्वे स्टेशन नाही, ते एस्.टी.चेही गांव नाही. नेमाड जिल्ह्यातल्या एका दूरच्या कोपऱ्यात अगदी दुर्लक्षित अवस्थेत बाजीरावाची समाधि आज अडीचशे वर्षे एकाकी उभी आहे. दिवसच्या दिवस तेथे कोणी जात नाही. बाजीरावाच्या पुण्यतिथीच्या दिवशी बाजीरावाचे काही भक्त तेथे जातात. त्यानंतर तेथे सारे कसे शांत शांत असते. दुपारच्या वेळी वाऱ्याच्या झोताने धर्मशाळेतली उनाड धूळ आणि पालापाचोळा उडत असतो, खारी धावत असतात, चिमण्या चिवचिवत असतात, जिन्यावरून शेजारच्या झोपडीतली मुले खेळत असतात, मुली गाणी म्हणत असतात. ज्याने जिवंतपणी सारे हिंदुस्थान हालविले होते, तो बाजीराव येथे झोपला आहे याची कुणाला जाणीवसुद्धा नसते. बाजीराव कोण हेच आधी कुणाला माहीत असेल तर पुढच्या गोष्टी. त्या ठिकाणाची कुठेही पर्यटन केंद्राच्या पुस्तिकेत जाहिरात येत नाही. जाण्याचा मार्ग सरळ नाही. माहितीचा माणूस कोणी नाही. उन्हाळ्यात जावे तर नेमाडात उष्माघाताची भीति, हिवाळ्यात जावे तर थंडीचा कहर. अशा स्थितीत पुष्कळ वेळा जाण्याचा संकल्प केला तरी अखेर आपल्या नशिबात बाजीरावाच्या समाधीचे दर्शन नाही असेच मी धरून चाललो होतो. पण सत्यसंकल्प वाया जाऊ नये अशीच ईश्वराची इच्छा असावी.

कारण योगायोगाने माझे येथील विद्यार्थी चि. मिलिंद देव यांच्यापाशी रावेरखेडीला जाण्याची गोष्ट मी काढली मात्र, त्यांनी ती सिद्धीला नेली. एरव्ही शिक्षक विद्यार्थ्याला मार्गदर्शन करतात. पण येथे क्रम उलटा झाला. त्यांच्या मार्गदर्शनाने त्यांच्याबरोबर मी खरगोण येथे प्रा. चापोरकर यांच्याकडे अर्थात् आधी पत्र पाठवून गेलो. माझी कसलीही पूर्वीची ओळख नसताना प्रा. चापोरकर, सौ. चापोरकर, चि. दिलीप, चि. जया चापोरकर व चि. सुहास चापोरकर यांनी ज्या अगत्याने माझे आदरातिथ्य केले, त्याची आठवण झाली म्हणजे आजही मन कृतज्ञतेने भरून येते. दुसऱ्या दिवशी चि. मिलिंद व चि. सुहास यांच्या बरोबर बसने मी खरगोणहून बेडियाला गेलो व बेडियाला टॅक्सी करून अखेर रावेरखेडी गाठले. दोन्ही बाजूंनी आंब्याची झाडे व खरबुजांच्या वाड्या असलेल्या शेतातील पायवाटेने जाताना दुरून बाजीरावाने बांधलेला पण आता मोडकळीस आलेला पेशव्यांचा वाडा दिसू लागला. नंतर आम्ही बाजीरावाने बांधलेल्या भक्कम काळचा पांढऱ्या दगडी बांधणीच्या रामेश्वराचे दर्शन घेतले व छोटी टेकडी चढून बाजीरावाच्या समाधीपुढे येऊन उभे राहिलो. त्यानंतर धर्मशाळेच्या ओवऱ्यात, पुरुषभर उंचीच्या खिडकीत बसून नर्मदेचे दर्शन घेतले. फार दिवसांचा संकल्प अखेर आज सिद्धीस गेला याचे त्या वेळी जे विलक्षण समाधान झाले, ते वर्णन करण्यास माझ्याजवळ शब्द नाहीत. बाजीरावाच्या समाधीचे दर्शन हा माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय अनुभव आहे. त्याचे सारे श्रेय चि. मिलिंद देव व प्रा. चापोरकर व त्यांचे कुटुंबीय यांना आहे. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. असे मी म्हटले, तर त्यांना ते कितपत आवडेल याची मला शंका वाटते. परंतु आयुष्याच्या

वाटचालीत वेळोवेळी आपणाला असे अकारण सुहृद भेटतात व त्यांच्या सौहार्दामुळेच अशा अवघड गोष्टी सोप्या होतात व सिद्धीला जातात, हे नाकारणे, निदान मला तरी शक्य नाही. त्याचप्रमाणे खरगोणच्या वास्तव्यात प्रा. व सौ. देशमुख व प्रा. जोशी यांचा झालेला परिचय, हाही माझा मोलाचा ठेवा आहे. बाजीरावाच्या समाधीच्या दर्शनाप्रमाणेच या सुजनांच्या सौजन्याच्या दर्शनामुळेही रावेरखेडीचा माझा अनुभव हा अनेक अर्थांनी चिरस्मरणीय ठरलेला आहे.

बाजीरावाच्या समाधीची व त्या स्थानाच्या पोचण्याच्या दृष्टीने जवळ जवळ अनुल्लंघनीय अडथळे असलेल्या परिस्थितीचे मी जे वर्णन केले आहे ते काल्पनिक नसून वास्तव आहे. या दृष्टीने 'पहिल्या बाजीरावाच्या समाधीचे नीट संरक्षण ?' या शीर्षकाखाली 'महाराष्ट्र टाईम्स' च्या १८ ऑगस्ट १९८३ च्या अंकात प्रसिद्ध झालेले पुढील वृत्त उद्बोधक वाटेल.

'इंदूर – इंदूरपासून एकशे पाच किलोमीटर्स अंतरावर रावेरखेडी या खेड्याजवळ नर्मदेच्या काठावर पहिले बाजीराव पेशवे यांची समाधि आहे. ही समाधि जवळजवळ उपेक्षितच असून अत्यंत वाईट अवस्थेत आहे. इतकेच नव्हे तर नर्मदा योजनेच्या नवागाव बांधाखाली बुडणाऱ्या क्षेत्रात ती समाधि येण्याची शक्यता आहे. बाजीराव स्मारक संरक्षण समितीचे श्री. बाळाराव इंगळे यांनी गेल्या मे महिन्यात बाजीराव पुण्यतिथीच्या निमित्ताने वर्तमानपत्रात लेख लिहून बाजीरावाच्या या समाधीच्या संरक्षणाकरिता एक आंदोलन उभे केले. परिणामस्वरूप मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री श्री. अर्जुनसिंह यांनी समितीला असे आश्वासन दिले आहे की ही समाधि नवागाव बांधाच्या पाणलोट क्षेत्रात बुडणार नाही असा प्रयत्न केला जाईल. पण ते शक्य झालेच नाही तर जवळच नर्मदेच्या काठावर या समाधीची पुनर्स्थापना करण्यात येईल. समाधीच्या व्यवस्थेसाठीही योग्य तो प्रबंध करण्यात येईल. होळकर राज्यात सरकारी अनुदानाने रावेरखेडी येथील समाधीस्थळावर बाजीराव स्मृति मोठ्या थाटाने साजरी होत असे. पण राजाश्रय संपल्याने ती परंपरा खंडित झाली. श्री. बाळाराव इंगळे, श्री. श्री. ना. मुळे आदि त्या परंपरेचे पुनरुज्जीवन करू इच्छितात.'

शिवछत्रपतींच्या रायगडाचे यात्रिक जसे भालजी पेंढारकर तसे बाजीरावाच्या रावेरखेडीचे यात्रिक इंदूरचे बाळाराव इंगळे. विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या वारकऱ्याच्या निष्ठेने दरवर्षी एप्रिल महिन्यात बाजीरावाच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी रावेरखेडीची वारी ते करीत असतात. त्यांनी पुढील शीर्षकाखाली वर्णन केलेला हा अनुभव जितका उद्बोधक तितकाच उद्वेगजनक आहे –

## 'थोरल्या बाजीरावांची समाधि – महाराष्ट्राला खंत नाही, मध्यप्रदेशाला गरज नाही!'

'कोणी येवो वा न येवो, प्रतिवर्षी या समाधीवर जायचे, पूजा करायची, भटजी मिळाला तर अभिषेक करायचा असा नियम मी बनविला आहे. इंदूरपासून १०५ कि.मी. अंतरावर

ही समाधि आहे. मार्ग अतिशय वाईट. निमाडचा जीवघेणा उकाडा नि वाहन उलटं होऊन मरण्याची भीति यामुळे मित्रमंडळी इच्छा असूनही माझ्याबरोबर येण्यास घाबरतात. समाधि स्थानावर पोचायचे तर रात्रीच इंदूरहून निघावयास हवे नि अगदी पहाटे रावेरखेडीस पोचावयास हवे. कारण सूर्य उगवताच असह्य उकाडा सुरू होतो नि जीव घाबरू लागतो. वेडिया हे लहानसे गाव सोडले की, समाधिस्थानापर्यंतचा रस्ता म्हणजे मध्यप्रदेश शासनाच्या नालायकीचा नमुनाच आहे. खाचखळगे, काटेरी झुडपे, पुरुषभर दोन्ही बाजूस धूळ नि काही मार्ग तर शेतातून जातो. जीप सारखी कलंडते. काही प्रसंगी तर असे वाटते की, श्रीमंतांच्या समाधीच्या दर्शनास निघालेली आम्ही मंडळी जिवंत समाधि तर घेणार नाही? कोणत्या वेळी जीप उलटी होईल नि त्याखाली आपण सापडू असे होत होते. पहाटेच कसेबसे पोचलो. गाडी पाहाताच समाधिस्थानासमोर वस्ती करून राहात असलेली नागडी उघडी शेंबडी पोरे भोवती गोळा झाली नि काही खायला मिळते का, काही पैसे मिळतात का म्हणून केविलवाण्या नजरेने आमच्याकडे पाहू लागली. खाली नर्मदेवर जाऊन सर्वांनी स्नान केले नि पूजेसाठी वर आलो. श्रीमंतांच्या समाधीवर जे शिवलिंग आहे त्यावरची धूळ कितीतरी दिवसात निघालेली नव्हती. श्री. नानासाहेब मुळे नि पंडित यांनी सर्व गाभारा धुऊन काढला नि नंतर आम्ही पूजेस लागलो. इंदूरहून आम्ही लाल टवटवीत गुलाबाची फुले नेली होती. ती त्या महापुरूषाच्या समाधीवर वाहिली नि अभिषेक केला. ही समाधि नवागाव बांध योजना जेव्हा प्रत्यक्षात सुरू होईल तेव्हा नर्मदेच्या पाण्याखाली बुडणार हे निश्चित! नुकतेच मुख्यमंत्री इंदूरला आले असताना मी नि इतर काही पत्रकारांनी त्यांना समाधीसंबंधाने अनेक प्रश्न विचारले. पण दुर्दैव असे (त्यांचे, आमचे नव्हे) की, मुख्यमंत्र्यांना यासंबंधी काहीही माहिती नाही; बाजीराव कोण नि कुठला, त्याचा मध्यप्रदेशाशी संबंध तरी काय? तो इथे मरायला कशासाठी आला? अशी जिथे स्थिति आहे, त्या ठिकाणी कसली समाधि नि कसली त्याची व्यवस्था?'

'या प्रांतातील मराठी माणूसदेखील अत्यंत उदासीन आहे. ज्या महाराष्ट्रात बाजीरावांनी अतुल पराक्रम केले नि महाराष्ट्राचे नाव नर्मदापार केले, त्या महाराष्ट्रास व त्याच्या राज्यकर्त्यास जिथे बाजीरावाची आठवण येत नाही, तिथे मध्यप्रदेशाची बातच कशाला? बाजीरावाची समाधि बुडली काय नि राहिली काय, कोणास त्याचे सोयरसुतक आहे? मला महाराष्ट्रातून बऱ्याच मंडळींनी पत्र पाठवून या समाधीसंबंधी विचारणा केली. परंतु हे काम लहानसहान नाही. या कामासाठी महाराष्ट्र शासनाने पुढे येऊन मध्यप्रदेश शासनाबरोबर पत्रव्यवहार करावयास हवा म्हणजे शासकीय पातळीवर हा प्रश्न सोडविला जाईल. पुण्याची बाजीराव स्मारक समिति व तिचे पुढारी या बाबतीत लक्ष घालतील तर किती बरे होईल! महाराष्ट्रातील इतिहासकार, साहित्यिक, वृत्तपत्रकार, सार्वजनिक नि राजकीय कार्यकर्ते, त्याचप्रमाणे पेशव्यांचे नातेवाईक नि आश्रित या सर्वांनी मिळून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या कानावर या सेनानीच्या समाधीसंबंधाचे वृत्त घालावे नि त्यांना मध्यप्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिण्यास भाग पाडावे. आमच्या प्रांतातील

एका महापुरुषाची समाधि तुमच्या प्रांतात आहे, तिची व्यवस्था नीट झाली पाहिजे, समाधीस्थानावर जाण्यासाठी कमीत कमी चांगली वाट, बाजीरावासंबंधी अगदी मामुली माहिती असलेला एखादा वाटाड्या, समाधीची पूजा-अर्चा रोज होईल अशी व्यवस्था, तो पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र व्हावा, एखादे लहानसे उपाहारगृह, अभ्यागतगृह. ह्याची मागणी मुख्यमंत्री श्री. वसंतरावदादा आमचे मुख्यमंत्री श्री. अर्जुनसिंग यांच्याकडे सहज करू शकतील.'

'समाधि जर पाण्याखाली गेली तर दुसरीकडे कशी बांधता येईल याचाही विचार व्हावयास हवा. महाराष्ट्रप्रमाणेच केंद्रात जी कोणी महाराष्ट्रीय मंडळी असतील त्यांनीही केंद्रशासनाकडून पुरातत्त्व विभागास लिहून या समाधीची नीट व्यवस्था करावी.'

'मध्यप्रदेशात महाराष्ट्रासंबंधी आकस आहे. येथील महाराष्ट्रीय संस्थांना महाराष्ट्राचे वावडे आहे. बाजीराव स्मारक वाचविण्यासाठी इकडील मराठी मंडळी काही चळवळ सुरू करतील अशी सुतराम शक्यता नाही. महाराष्ट्र आम्हांस काय विचारतो तर आम्ही त्यांना विचारावे अशी तक्रार सर्वत्र ऐकू येते. मग आता या समाधीचे होणार तरी काय? जो पावेतो ती जीर्णशीर्ण अवस्थेत उभी आहे तो पावेतो आमच्यासारखी काही मंडळी रावेरखेडीस जातील. परंतु पाण्यात बुडाल्यानंतर कुठली रावेरखेडी नि कुठली बाजीरावाची समाधि? सगळा आनंदच आहे!!' (लोकसत्ता, २२ मे १९८३)

बाळाराव इंगळे यांच्यासारख्या उमद्या बाजीराव भक्ताच्या ह्या उदात्त व्यथेची कथा वाचल्यानंतर साहजिकच मनात एक मोठा प्रश्न उभा राहतो की, बाजीरावासारख्या मोठ्या पुरुषाच्या समाधीची ही दुर्दशा आज स्वतंत्र भारतातही व्हावी याचे कारण काय? कोणती गोष्ट बाजीरावाला बाधली?

आपणास काय बाधले, ह्या प्रश्नाचे विवेचन करताना त्र्यं. शं. शेजवलकर यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, त्याची या संदर्भात आठवण होते. ते म्हणतात– 'मला काय बाधले? काळा आदमी झालो हे बाधले, हिंदुस्थानात जन्मलो हे बाधले, हिंदु जन्मलो हे बाधले, महाराष्ट्रात जन्मलो हे बाधले, ब्राह्मण जन्मणे हे बाधले, फार काय, कऱ्हाडा जन्मलो तेही बाधल्यावाचून राहिले नाही!' ('शय्येवरून' शेजवलकरांचे लेख - पृ. ४०४) वैयक्तिक दुःखांना सामाजिक संदर्भ देण्याची शेजवलकरांची प्रवृत्ति प्रसिद्धच आहे. पण ती वाटते तितकी दोषास्पद नसून उलट शास्त्रीय आहे. कारण व्यक्ति ही समाजाचा घटक असल्यामुळे समाजाच्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीचे बरे-वाईट परिणाम तिला भोगावे लागतातच. शेजवलकरांची तर्कपरंपरा बाजीरावाच्या बाबतीत चालवून बाजीरावाच्या समाधीच्या सद्यःस्थितीतील उपेक्षेची उपपत्ति अशी दिली तर ती शास्त्रीय होईल काय की, 'बाजीराव काळा आदमी जन्मला हे त्याला बाधले, हिंदुस्थानात जन्मला हे बाधले, हिंदु म्हणून जन्मला हे बाधले, महाराष्ट्रीय म्हणून जन्मला हे बाधले, ब्राह्मण जन्मला हे बाधले, फार काय, चित्पावन कोकणस्थ व (त्यातही पुण्याचा) ब्राह्मण जन्मला हे बाधले?'

सकृत्दर्शनी हा तर्क प्रतिष्ठित वाटतो खरा, पण तसा तो नाही. कारण बाजीरावाचे ब्राह्मण्य

त्याला बाधले असे ज्यांना वाटत असेल त्यांनी अलिबागला जाऊन कान्होजी आंग्रे यांची समाधि पाहावी. अलिबागला तुम्ही प्रवेश करतानाच 'सरखेल कान्होजी आंग्रेनगर' अशी भव्य फलक धारण करणारी वसाहत दिसते. ती पाहून हुरूपाने तुम्ही कान्होजी आंग्रे यांची समाधि पाहू जाल तर तुमच्या आशेची घोर निराशा झाल्याशिवाय राहणार नाही. एके काळी मुंबईपासून कारवारपर्यंतचा सारा पश्चिम किनारा ज्याने आपल्या नजरेच्या जरबेत राखला होता, व ज्याच्या सागर दिग्विजयाचा डंका विलायतेपर्यंत वाजत होता, त्या सरखेल कान्होजी आंग्रे याची समाधि आज अत्यंत दीनवाण्या अवस्थेत उभी आहे. समाधि काळ्या अष्टकोनी दगडांची आहे. दोन पायऱ्या आहेत. त्यावर पावलांच्या प्रतिकृति आहेत. समाधीची एक संपूर्ण बाजू नादुरुस्त झालेली आहे. ती उघडी आहे. त्या बाजूचे दगड ढासळलेले आहेत. समाधीभोवती धूळ आणि काचा पडलेल्या आहेत. विशेष म्हणजे, ज्या अलिबाग नगरला कान्होजी आंग्र्यामुळे ऊर्जित दशा आली, जेथे त्याचा नाविक तळ होता, आणि त्याच्यामुळे ज्या शहराला नकाशात स्थान मिळाले, त्या अलिबाग शहराच्या नगरपालिकेपासून अवघ्या हाकेच्या अंतरावर कान्होजीची ही समाधि आज अडीचशे वर्षे उभी आहे. छत्रपति संभाजीची समाधि आज चांगल्या स्थितीत आहे व दरवर्षी तेथे उत्सव होतो. पण पूर्वी निवडुंगाच्या जंगलात ती हरवली होती. तिचे त्याच्या वेळचे छायाचित्र बेंद्रे यांच्या 'संभाजी चरित्रा'त दिले आहे. फार काय, ज्या शिवाजी महाराजांना आज बरे दिवस आले आहेत, त्यांच्या रायगडच्या समाधीवर शंभर वर्षांपूर्वी गवत वाढले होते. मुंबई सरकारने त्या समाधीची व्यवस्था व पूजाअर्चा करण्यासाठी, ते परकी सरकार असून सुद्धा, वर्षाला पाच रुपयांचे अनुदान मंजूर केले. हे ज्या थोर साहेबाच्या प्रेरणेने झाले त्या जेम्स डग्लस साहेबाने ही समाधि पाहून जे उद्गार काढले, ते आपल्या लोकांच्या अशा बाबतीतल्या प्रवृत्तींवर नेमके बोट ठेवतात. तो म्हणतो –

'No man now cares for Shivaji. Over all these wide domains, which once owned him Lord and Master, acquired by so much blood and treasure, not one man now contributes a rupee to keep or repair the tomb of the Founder of the Maratha Empire.' (Book of Bombay - James Douglas 1883) ('शिवाजीची आता कोणलाही पर्वा नाही. एवढा रक्तपात करून व पैसा खर्च करून ज्याने जो हा अफाट प्रदेश मिळवला, व ज्या प्रदेशाचा एके काळी तो स्वामी आणि सम्राट होता, त्या प्रदेशातील एक माणूससुद्धा मराठी साम्राज्याच्या संस्थापकाची ही समाधि दुरुस्त करण्यासाठी किंवा शाबूत ठेवण्यासाठी एक रुपया सुद्धा खर्च करीत नाही.')

तेव्हा बाजीराव, कान्होजी आंग्रे, संभाजी, शिवाजी यांच्या समाधींच्या बाबतीत जाति विचाराचा तादृश संबंध नाही, असलाच तर फार थोडा आहे. त्यांच्या समाधींचा विचार करताना औरंगजेबाच्या मृत्युपत्रातले एक वाक्य आठवते - 'The dead are at the mercy of living.' मेलेली माणसे जिवंत माणसांच्या दयेवर अवलंबून असतात. आणि जिवंत माणसांची मने

मेलेली असली म्हणजे त्या मेलेल्या माणसांचा वाली कोणी नसतो; आणि जिवंत माणसांची मने मरण्याचे एकमेव कारण म्हणजे वासुदेवशास्त्री खरे यांनी वर्णन केलेली 'देशाभिमानशून्यता' होय. आज नर्मदेवरचे धरण खूपच गाजते आहे आणि त्याच्यात बाजीराव बहुधा बुडणार असा रंग दिसतो आहे. पण या बाबतीत धरणे बांधणे आणि औद्योगिक क्रांति करून भौतिक उत्कर्ष साधण्याचे जे कारण दिले जाते व ज्याचे हे अपरिहार्य परिणाम आहेत असे भासविले जाते, ते पटत नाही. कारण ज्यांच्या औद्योगिक उत्कर्षापुढे आपली औद्योगिक क्रांति म्हणजे केवळ 'बालक्रीडा' ठरावी, त्या अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादि पाश्चात्य राष्ट्रांनी औद्योगिक क्रांतीच्या नावाखाली आपल्या सांस्कृतिक संचिताचा बळी दिलेला नाही. लंडनचा विस्तार किती होतो आहे! पण या विस्ताराच्या बाबीखाली त्यांनी डॉ. जॉनसनचे दोनशे वर्षांपूर्वीचे घर भुईसपाट केलेले नाही, उलट ते जतन करून ठेवलेले आहे, इतकेच नव्हे तर ज्या बोटीत बसून दर्यासारंग नेल्सनने ट्रॅफलगारची लढाई, १८०५ साली पावनखिंडीतल्या बाजी प्रभूप्रमाणे शेवटच्या श्वासापर्यंत गाजविली, ती त्याची जुनी पुराणी ऐतिहासिक नौकाही सांभाळून ठेवलेली आहे. तेव्हा आपले बोलणे उगाच आहे. आपल्या इतिहासाची आपणाला अडचण होते आहे व त्यात सांभाळण्यासारखे आपल्याला काही दिसत नाही, हे खरे दुखणे आहे. आपल्या उज्ज्वल इतिहासाशी फारकत घेऊन नवा इतिहास घडवू पाहणारे आपणासारखे अनैतिहासिक वृत्तीचे लोक जगाच्या पाठीवर थोडेच असतील. तरी पितृपूजेची परंपरा आपल्या देशात चालत आलेली आहे! ती पुन्हा जागृत होईल आणि आपणास इतिहासाकडे पाहण्याची दृष्टि येईल तेव्हा येवो, पण तोपर्यंत तरी, बाजीरावाच्या पराक्रमावर नर्मदेचे पाणी ओतण्याचा 'पराक्रम' पूर्ण होण्याआधी रावेरखेडीच्या बाजीरावाच्या समाधीचे दर्शन घेणे बरे.

या संदर्भात विठ्ठलराव घाटे यांनी 'आबासाहेब जहागीरदार' या आपल्या अप्रतिम व्यक्तिचित्रात केलेल्या समारोपाची आवर्जून आठवण होते–

'याप्रमाणे अर्धपोटी राहून, घरात भिंतीआड काबाडकष्ट करून, अर्ध्या अंधारात, अर्ध्या प्रकाशात, बाहेर भीतभीत वावरून व लोकांसमोर मराठमोळ्याचा अस्सल बाणा दाखवून, मान न लवविता, हात न पसरता, रात्री भूतकाळाची पुसट स्वप्ने पाहात, दिवसा रात्रीच्या बाशा स्वप्नांच्या नशेत झिंगलेली कितीतरी घराणी अद्याप गोदा, प्रवरा, कृष्णाकाठी दृष्टीस पडतील. दोस्तहो, लवकर जाऊन त्यांचे दर्शन घ्या, कारण त्या त्या नदीच्या काठी त्यांचे अंत्यविधि आज चालू आहेत.' ('काही म्हातारे व एक म्हातारी' पृ. १०)

## यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच

आमच्या चाळीसगावाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची आणि ना. बं. वाचनालयाची ग्रंथांनी भरलेली समृद्ध कपाटे माझ्या हाताशी असल्यामुळेच हा ग्रंथ मी लिहू

शकलो. त्याबद्दल ही 'ज्ञानाची सदावर्ते' उघडणाऱ्या आणि मला तेथे 'ज्ञानामृतं भोजनम्' अशा ज्ञानभोजनासाठी मुक्तद्वार ठेवणाऱ्या त्या ग्रंथालयाच्या व संस्थांच्या अधिकारी वर्गाचा म्हणजे प्राचार्य चित्ते व डॉ. देव व त्यांचे सहकारी यांचा मी अत्यंत ऋणी आहे. येथील पं. गो. जोशी यांनी द. ग. गोडसे यांचा 'मस्तानी' हा लेख असलेला 'महाराष्ट्र टाइम्स'चा १९७९ चा दिवाळी अंक मला दिला, त्यामुळेच मस्तानीचे कूळ व मूळ मुळापासून शोधण्याची दृष्टि मला आली. याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. चि. मिलिंद देव व चापोरकर कुटुंबियांचा तर मी ऋणी आहेच.

बाजीरावाचा हा चरित्र ग्रंथ प्रथम पुण्यातील 'स्नेहल प्रकाशन' या प्रतिष्ठित प्रकाशन संस्थेचे कर्तबगार संचालक श्री. रवि घाटपांडे यांनी प्रसिद्ध करण्याची योजना केली होती. परंतु श्री. मामा दाते हा ग्रंथ प्रसिध्द करू इच्छितात असे समजल्यावर त्यांनी 'मामांच्या हातून हा ग्रंथ प्रसिध्द होत असेल तर त्यात मला आनंदच आहे, कोणीकडूनही का होईना, बाजीरावाचे हे चरित्र लवकर प्रसिद्ध व्हावे एवढीच इच्छा आहे', असे उद्गार काढले. इतकेच नव्हे तर आपले स्नेही प्रा. प्र. के. घाणेकर यांच्याकरवी ग्रंथाचे हस्तलिखित मामांकडे पाठवून दिले. मनाचे हे औदार्य आजच्या काळात खरोखर दुर्मिळ म्हटले पाहिजे. याबद्दल मी श्री. घाटपांडे यांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणे त्यांचे व माझे मित्र प्रा. प्र. के घाणेकर यांनी या ग्रंथाचे प्रकाशनाच्या दृष्टिकोणातून साक्षेपाने पूर्वपरीक्षण केले याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. माझे मित्र मॉडर्न कॉलेजातील इतिहासाचे प्राध्यापक प्रा. मनोहर कुलकर्णी यांनी 'मराठी रियासत - पुण्यश्लोक शाहू - २ - पेशवा बाजीराव' ही रियासतीची नवी १९४२ची आवृत्ति मला दिली याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत; कारण मन गोंधळून टाकणाऱ्या मराठी इतिहासाच्या साधनांच्या निबिड जंगलात सरदेसायांच्या रियासती ह्या केवळ मार्गदर्शक 'दीपिका'च आहेत.

## 'आम्राश्च सिक्ता: पितरश्च तृप्ता:।'

आज बाजीरावाचा हा चरित्रग्रंथ प्रसिद्ध झालेला पाहण्यास मामा आपल्यात नाहीत याचे दु:ख वाटल्याशिवाय राहात नाही. पण मामा गेले तरी त्यांची प्रेरक स्मृति आहेच. आपल्या हातून हा ग्रंथ प्रसिद्ध व्हावा अशी मामांची फार इच्छा होती. आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्यसैनिकाच्या निवृत्ति-वेतनाचे साठ हजार रुपये त्यांनी या ग्रंथासाठी राखून ठेवले होते. जाण्यापूर्वी काही दिवस त्यांनी मुकुंदरावांना विचारले की, 'हा ग्रंथ तू प्रसिद्ध करशील ना?' तेव्हा मुकुंदरावांनी त्यांना ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे अभिवचन दिले. बाजीरावाचे सारे आयुष्य संकटात गेले. त्याप्रमाणे त्याच्या या चरित्रावरही संकट आले नाही असे नाही. या ग्रंथातील 'मध्यान्ह' या भागाची सातशे पानांची हस्तलिखित प्रतच हरवली. तिची दुसरी प्रतही माझ्यापाशी नव्हती. तेव्हा 'जे

होते ते बऱ्यासाठी' असे म्हणून कार्लाईलच्या 'फ्रेंच राज्यक्रांति' प्रमाणे मी ती सारी प्रत पुन्हा लिहून काढली आणि दोन वेळा लेखन झाल्यामुळे ही दुसरी प्रत, माझ्या मताप्रमाणे बरीच सरस उतरली; मामांच्या पुण्याईने साऱ्या संकटांचा परिहार झाला. आपले सारे व्याप आणि ताप सांभाळून मुकुंदरावांनी आज हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे व मामांना दिलेले वचन पूर्ण केले आहे; त्यांनी इतिहासाचे कार्य केले आहे व पितृऋणही उत्तम प्रकारे फेडले आहे. 'आम्राश्च सिक्ता: पितरश्च तृप्ता:' आम्रवृक्षांना पाणीही घातले व पितरांचे तर्पणही केले, याबद्दल मुकुंदरावांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे.

३६, न्यू आनंदनगर,
तळेगाव दाभाडे

# १ □ बाजीरावास पेशवेपद प्राप्ति

## बाजीरावास विरोध : कोकणस्थ विरुद्ध देशस्थ!

दि. २ एप्रिल १७२० रोजी छत्रपति शाहूचा पेशवा बाळाजी विश्वनाथ हा सासवड मुक्कामी एकाएकी अल्प आजाराचे निमित्त होऊन मृत्यू पावला. त्या वेळी त्याचे वय फक्त साठ वर्षांचे होते. बाळाजीच्या मृत्यूमुळे शाहूला अत्यंत दुःख झाले. पण दुःख करीत बसण्यासही त्याला वेळ नव्हता. कारण बाळाजीच्या मृत्यूने त्याचा मित्रापेक्षाही अधिक असलेला निकटचा सहकारीच केवळ हिरावला नव्हता; तर त्याच्या राज्याचा आधारस्तंभ असलेला पेशवा गेला होता. १७०८ च्या जानेवारीत सातारा मुक्कामी शाहूला राज्याभिषेक झाला तेव्हापासून दमाजी थोरात, रंभाजी निंबाळकर, कृष्णराव खटावकर, कोल्हापुरची ताराबाई आणि छत्रपति संभाजी अशा स्वकीय आणि चाकणचा लोधीखान, जुन्नरचा करीमबेग, कऱ्हाडचा पडदुल्लाखान अशा परकीय विरोधकांस तोंड देऊन शाहूचे डळमळणारे सिंहासन स्थिर केले ते केवळ बाळाजीनेच होय. बाळाजी मृत्यू पावला तेव्हा पेशवेपदासाठी इच्छुक असलेले चिमणाजी दामोदरासारखे लोक नव्हते असे नाही. परंतु बाळाजी विश्वनाथावर शाहूचा जेवढा विश्वास होता तेवढा त्याच्यावर नव्हता. बाळाजीच्या मागे त्याच्या इतक्या कौशल्याने आणि निष्ठेने राज्याचा वाढता प्रपंच कोण सांभाळणार असा प्रश्न शाहूपुढे दत्त म्हणून उभा राहिला; आणि त्याचे उत्तर देणे वाटले तितके सोपे नव्हते. बाळाजीला बाजीराव आणि चिमाजी अप्पा असे दोन मुलगे होते आणि ते दोघेही त्या काळाच्या मानाने कर्ते-सवर्ते होते. बाजीरावाचे वय त्या वेळी वीस वर्षांचे होते आणि चिमाजी त्याच्यापेक्षा चार-पाच वर्षांनी लहान होता. बापानंतर मुलगा या वंशपरंपरेच्या न्यायाने बाळाजीनंतर त्याची पेशवाई त्याचा वडील मुलगा बाजीराव यास मिळणे क्रमप्राप्त होते. परंतु ज्या वेळी शाहूने बाजीरावाला पेशवाई देण्याचा विचार आपल्या मंत्र्यापुढे ठेवला तेव्हा मंत्र्यांपैकी ज्येष्ठ आणि अनुभवाने पोक्त असलेल्या श्रीपतराव प्रतिनिधीने त्याला जोराचा विरोध केला आणि इतरही मंत्र्यांनी त्याचीच 'री' ओढली. श्रीपतराव प्रतिनिधि हा देशस्थ होता आणि सचिव नारोशंकर, त्याचा मुतालिक पंताजी शिवदेव, अमात्य बाळकृष्ण वासुदेव हणमंते, सुमंत महादाजी गदाधर, मंत्री रामचंद्रपंत पुंडे, न्यायाधीश होनाजी अनंत, पंडितराव मुद्गलभट, उपाध्ये प्रभृति शाहूच्या मंत्रिमंडळातील बहुतेक सारे मंत्री देशस्थच होते. बाळाजी विश्वनाथापूर्वीचा पेशवा बहिरो मोरेश्वर

बाजीरावास वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी पितृपुण्याईने मराठेशाहीचे पेशवेपद प्राप्त झाले. पुढे वीस वर्षांच्या कारकीर्दीत तो एकवीस लढाया लढला व त्या सर्वांत तो विजयी झाला. पालखेडच्या विजयानंतर बाजीरावाच्या कर्तृत्वाची व्याप्ति एवढी वाढली की बाजीराव सातान्यास आला तेव्हा वेशीवर त्याचे शाहूने उपस्थित राहून जातीने स्वागत केले व दरबारात जाहीर केले की, "राऊ स्वामींची मर्जी अवघ्यांनी पाळावी. त्याच्या चित्तास क्षोभ करू नये. छत्रसालाच्या बुंदेलखंडाचे रोहिलखंड होण्याची आपत्ति बाजीरावाने ऐनवेळी केलेल्या मदतीमुळे टळली आणि त्यामुळे बाजीरावावर प्रसन्न होऊन छत्रसालाने बाजीरावास आपला तिसरा मुलगा मानले. वात्सल्य व कृतज्ञतेपोटी. छत्रसालाने बाजीरावास आपल्या राज्याच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा दिला. तसेच पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणीत तिसरा वाटाही त्यास दिला. पण त्यानेही छत्रसालाचे समाधान झाले नाही. म्हणून त्याने आपल्या मुसलमान उपपत्नीपासून झालेली कन्या त्याला अर्पण केली. तिचे नाव मस्तानी !

येथपर्यंतचा (१७२०-१७३०) हा कालखंड बाजीरावाच्या जीवनातील पूर्वार्ध होय. तो वरील ग्रंथात उभा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

काळ प्रकाशन, पुणे - ३०.